साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस

■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2022-2024

मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १७ ● अंक २२ ● मंगळवार, दि. १५ ते २२ ऑक्टोंबर २०२४ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रु

## राज्यात वाशिमचे नाव पहिल्या क्रमांकावर !

# आरोग्य विभागाची सेवा सर्वोत्कृष्टच

### ■ निर्देशांकाची तंतोतंत अंमलबजावणी ■ सीएस, डिएचओंच्या सर्वोत्कृष्ट कामगिरीवर शिक्कामोर्तब

पिंगलाक्षी एक्सप्रेस

**वाशिम,दि.१३ ऑक्टोबर (जिमाका): राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमातील निर्देशकांवर आधारित ऑगस्ट महिन्यातील जिल्हा शल्य चिकित्सक (सीएस) व जिल्हा आरोग्य अधिकारी (डीएचओ) संवर्गातील रँकिंगची घोषणा ११ ऑक्टोबर रोजी करण्यात आली. सीएस व डीएचओ या दोन्ही संवर्गातून वाशिम जिल्हा अव्वल असून, या निमित्ताने जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडुरंग ठोंबरे यांच्या सर्वोत्कृष्ट कामगिरीवर राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने शिक्कामोर्तब केले.**



राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांतर्गत मातृ स्वास्थ्य, मुलांचे आरोग्य, कुटुंबनियोजन असल्याचे या पडताळणी आढळून आले. हृदयरोग, उच्च रक्तदाब, मधुमेही रूग्णांना



यासह एकूण ३० निर्देशांकाच्या अनुषंगाने आरोग्य विभागाच्या पथकामार्फत डीएचओ व सीएसच्या अधिनस्त असलेल्या आरोग्य संस्थांमध्ये प्रत्यक्ष पडताळणी व पाहणी केली जाते. ऑगस्ट २०२४ मध्ये विशेष चमूमार्फत पाहणी व पडताळणी केली होती.

जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय यांसह सरकारी रुग्णालयांत माता व बालकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा, लसीकरण, कुटुंब नियोजन कार्यक्रम, साथरोग प्रतिबंधात्मक उपाययोजना सर्वोत्कृष्ट पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सेवाही उत्कृष्ट असल्याचा शेरा या चमुने दिला.

महिलांची प्रसुती, अद्ययावत डायलिसीस सेवा, कुपोषित बालकांसाठी पोषण पुर्नवसन केंद्र (एन.आर.सी.), क्रिटीकल रुग्णांसाठी आयसीयु तसेच शस्त्रक्रियांकरीता अत्याधुनिक व सुसज्ज शस्त्रक्रियागृह, मोतीबिंदु शस्त्रक्रिया, रक्तपेढी, सोनोग्राफी व सी. टी. स्कॅन यांसह अन्य आरोग्य सेवांमध्ये केलेली कौतुकास्पद कामगिरी पथकाने अधोरेखित केली.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडूरंग ठोंबरे यांनी जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. मॅडम, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे सर यांच्या मार्गदर्शनात व सर्व आरोग्य अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या सहकार्यातून आरोग्य संस्थांमध्ये केलेले बदल आणि रुग्णांना पुरविलेली आरोग्य सेवा राज्यात सर्वोत्कृष्ट ठरली असल्यावर ऑगस्ट महिन्यातील निर्देशांक रँकिंग अहवालाने शिक्कामोर्तब केले.



रुग्णांना सरकारी दवाखान्यांमधून दर्जेदार व विहित वेळेत आरोग्य सेवा पुरविण्याचा पुरेपूर प्रयत्न केला जातो. आरोग्य सेवेच्या बळकटीकरणासाठी जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. व मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभत आहे. सर्वांच्या प्रयत्नातून आरोग्य विभागाच्या कामगिरीत राज्यात वाशिम जिल्हा प्रथम आला आहे. यापुढेही अजून प्रभाविपणे आरोग्य सेवा देण्यावर आमचा भर राहील.

**- डॉ. अनिल कावरखे**

### ■ सुसज्ज १० बेडच्या डायलिसिसची व्यवस्था

जिल्हा सामान्य रुग्णालयात वातानुकूलित सुसज्ज १० बेडच्या डायलिसिसची व्यवस्था आहे. येथे एकूण १४ डायलिसिस मशीन असून तज्ज्ञ डॉक्टर व कर्मचारीदेखील उपलब्ध ठेवण्यात आले. डायलिसिस सेंटर कार्यान्वित असल्याने सर्वसाधारण आर्थिक परिस्थिती असणाऱ्या रुग्णांना मोफत उपचाराची सोय उपलब्ध झाली. जिल्हा सामान्य रुग्णालयातील सुविधेमुळे सर्वसामान्य रुग्णांचा हा खर्च वाचत आहे.

### ■ राज्यात प्रथम येण्याचा बहुमान पहिल्यांदाच

मागील काही महिन्यांपासून जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी.एस. ठोंबरे यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनात तसेच कर्मचाऱ्यांच्या सहकार्यातून सरकारी आरोग्य संस्थांमध्ये सुधारणा घडवून आणल्याचा धडाका लावला आहे. सरकारी रुग्णालयांत येण्याच्या वेळा अचूक पाळल्या जातात. आरोग्य विभागाच्या विविध उपक्रमांची योग्य अंमलबजावणी केली जाते. रुग्णांना विहित वेळेत दर्जेदार सुविधा पुरविल्या जातात. सरकारी रुग्णालयांमध्ये दैनंदिन स्वच्छता, नीटनेटकेपणा, भौतिक सुविधांची उपलब्धता, रुग्णांशी सौजन्यपूर्वक वागणूक, मुबलक औषधी साठा आदी बाबींना जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी.एस. ठोंबरे यांनी कटाक्षाने प्राधान्य दिले. या दोघांचे परिश्रम फळाला आले असून, याचीच पोचपावती म्हणून राज्यात आरोग्य विभागाच्या कामगिरीत वाशिम जिल्हा प्रथम आला आहे. ही बाब जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी ठरली

# जिल्हा न्यायालयात कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम संपन्न



**वाशिम,दि.१४ ऑक्टोबर (जिमाका):- जिल्हा विधि सेवा प्राधिकरण तथा जिल्हा विधिज्ञ संघाच्या संयुक्त विद्यमाने १० ऑक्टोबर २०२४ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम येथे जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. व्ही. हांडे यांच्यासह जिल्हा न्यायाधीश- २ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश एन. आर. प्रधान,सरकारी अभियोक्ता ए. आर. व्यवहारे, जिल्हा विधिज्ञ संघाचे अध्यक्ष ॲड. अनुप बाकलीवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात डॉ. रवी अवचार यांनी मानसिक ताणतणावाबाबत मार्गदर्शन व उपचार या विषयावर महत्वपुर्ण मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन ॲड. डि.डि. गुडदे यांनी केले व आभार ॲड. व्ही. एम. तिफणे, यांनी मानले. जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम येथील न्यायिक अधिकारी व कर्मचारी वृंद उपस्थित होते. तसेच विधिज्ञ मंडळी यांची उपस्थिती होती.

## संपादकीय

# कांद्याच्या बनावट बियाण्यांचा धोका

कांद्याचे दर वाढल्यामुळे अनेक शेतकरी सध्या मोठ्या प्रमाणात कांदा लागवडीकडे वळले आहेत. याच परिस्थितीचा फायदा घेत सध्या बाजारात बनावट कांदा बियाण्यांचा धोका वाढला आहे. कांदा वा कुठल्याही पिकाचा बियाणे हा पाया मानला जातो. बियाणे बनावट निघाले तर महागड्या दरात केलेली खरेदी. रोपे तयार करण्यासाठी उपसलेले कष्ट वाया जातात. शिवाय संपूर्ण हंगाम हातातून जातो. कांद्याचे विविध कंपन्यांचे बियाणे खरेदी करणाऱ्या १० पैकी तीन शेतकऱ्यांना बनावट बियाण्यांच्या समस्येला तोंड द्यावे लागते, असे महाराष्ट्र कांदा उत्पादक संघटनेचे निरीक्षण आहे. संपूर्ण राज्यात बनावट बियाण्यांमुळे दरवर्षी मोठ्या संख्येने कांदा उत्पादकांची फसवणूक होते. बियाणेच फसले की पुढील सर्व मेहनत, खर्च वाया जाऊन शेतकऱ्यांच्या पदरी केवळ निराशा आणि तोटा येऊ शकतो. मागील दुष्काळी वर्षामुळे यंदा रब्बी हंगामात बियाण्यांचा तुटवडा आहे. त्यामुळे बनावट बियाण्यांचा बाजार पुन्हा भरास येण्याची चिन्हे असून उत्पादकांनी नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती दक्षता घेण्याची गरज आहे.

राज्यात वर्षभरात खरीप, लेट खरीप आणि रब्बी या तीन हंगामात कांद्याचे पीक घेतले जाते. दिवाळीनंतर रब्बी हंगामासाठी लागवड सुरू होईल. नोव्हेंबर ते जानेवारीपर्यंत ती चालते. दुष्काळामुळे गतवर्षी बहुतांश शेतकऱ्यांना स्वत: बियाणे तयार करता आले नाही. त्यामुळे यंदा संबंधितांना खासगी कंपन्यांच्या बियाण्यांवर अवलंबून रहावे लागणार आहे. या परिस्थितीत काळ्या बाजाराला चालना मिळते. महागड्या दरात बियाणे खरेदी करावे लागते. बनावट बियाण्यांमुळे उत्पादकांची फसवणूक होण्याची शक्यता वाढते. कांद्याचे बियाणे काळ्या रंगात व विशिष्ट आकाराचे असते. वाफ्यात वा पाच ते १० गुंठ्यात त्यांची लागवड करून प्रथम रोपे तयार केली जातात. शेतात टाकल्यानंतर १०-१२ दिवसानंतर त्याची उगवण क्षमता लक्षात येते. रोपे पूर्ण तयार होण्यास साधारणत: ४५ ते ५० दिवसांचा कालावधी लागतो. पाऊसमान, वातावरण, रोगराईचा प्रादुर्भाव अशा कारणांस्तव हा कालावधी काहिसा मागे-पुढे होऊ शकतो. रोपे तयार झाल्यानंतर त्यांची शेतात पुनर्लागवड केली जाते. खरीप आणि लेट खरीप कांदा ९० ते ९५ दिवसांत तर रब्बी कांद्याला लागवड केल्यानंतर १२० दिवस लागतात.

कांद्याचे बियाणे दोन प्रकारात उपलब्ध होतात. एक म्हणजे जे शेतकरी स्वत: तयार करतो. आपल्या शेतात पिकलेल्या कांद्यातून उत्कृष्ट दर्जाचा कांदा तो स्वत: बाजुला काढतो. त्याची नंतर वाफा पद्धतीने कमी क्षेत्रात लागवड करतो. त्याची उगवण होऊन फुले येतात. नंतर गोंडे तयार होऊन काळ्या बिया तयार होतात. हेच बियाणे तो वापरतो. त्याची उत्पादकाला पूर्ण खात्री असते. कारण चांगल्या दर्जाच्या कांद्यापासून पारंपरिक पद्धतीने ती तयार केलेली असतात. ज्यांच्याकडे अशा प्रकारचे बियाणे नसते, त्यांना दुसऱ्या प्रकारातील म्हणजे खासगी कंपन्यांची बियाणे घ्यावी लागतात. यातच फसवणुकीचा धोका असतो.

# शिवाजी विद्यालय जिल्ह्यातून तृतीय क्रमांकाचे मानकरी

रिसोड - मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा -२ या योजनेअंतर्गत संपूर्ण महाराष्ट्रभर एक शैक्षणिक उठाव शिक्षण क्षेत्राने अनुभवला. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा भाग एक च्या अभूतपूर्व यशानंतर प्रशासनाच्या वतीने या महत्त्वकांक्षी व दूरदर्शी योजनेचा टप्पा २ राबविण्याचा निर्णय घेतला.

मागील वर्षी या योजनेअंतर्गत भाग एक मध्ये शाळांच्या भौतिक सुविधांची तपासणी झाली व त्या अंतर्गत राज्यभरातून केंद्र स्तर ते राज्यस्तरापर्यंत अनेक शाळांनी आपल्या भौतिक सुविधा परिपूर्ण करून स्पर्धेमध्ये यशस्वी कामगिरी करून मोठ्या,घसघशीत रकमेची बक्षिसे मिळविली. यावर्षी या योजनेचे स्वरूप संपूर्णपणे बदलविण्यात आले होते. १५० गुणांची ही स्पर्धा शाळेतील शैक्षणिक दर्जा, शाळेचे समाजाभिमुख काम, समाजाप्रती शाळेची असलेली नैतिक जबाबदारी,विद्यार्थी केंद्रित विविध उपक्रम, वृक्षारोपण, स्काऊट गाईड, विविध शिष्यवृत्ती परीक्षा, गणित, भाषा आणि विज्ञान विषयाची अध्ययन-अध्यापन चाचणी, शिक्षकांची गुणवत्ता, दिव्यांगांना शैक्षणिक प्रवाहात सामावून घेणे, विद्यार्थ्यांची गळती थांबविण्याकरता केलेले प्रयत्न अशा विविध उपक्रमांची पडताळणी करून ज्या शाळा सर्वोत्कृष्ट कामगिरी करतील त्या शाळांना केंद्रस्तरांपासून तर राज्यस्तरापर्यंत शासनाने सन्मानित करण्याचा अभिनव उपक्रम मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा -२ या माध्यमातून राबविला.

उपक्रमांतर्गत वाशिम जिल्ह्याने सुद्धा या उपक्रमात आपला सहभाग नोंदवून जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रातील नामांकित शाळांनी आपली छाप उपक्रमावर सोडली. नुकताच या स्पर्धेचा निकाल जाहीर झाला असून वाशिम जिल्ह्यातून जे.सी.हायस्कूल कारंजाने वाशिम जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळवला याच बरोबर अमरावती विभागातूनही सदर विद्यालयाने प्रथम प्रथम क्रमांक मिळविला. जिल्ह्यातून द्वितीय क्रमांक कानडे इंटरनॅशनल स्कूल वाशीमने तर वाशिम जिल्ह्यातून तृतीय क्रमांक श्री शिवाजी शिक्षण संस्था वाशिम द्वारा संचलित श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय भर जहागीरने पटकविला हे विशेष.

शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय हे ग्रामीण भागातील एक अग्रगण्य विद्यालय असून नेहमीच या ठिकाणी असलेल्या सुविधांच्या आधारे विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचे काम विद्यालयामधून होत असते शिवाजी विद्यालयाने या उपक्रमांमध्ये मागच्या वर्षीही तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळविला होता हे विशेष. यावर्षी विद्यालयाने पूर्ण ताकतीने तयारी करून रिसोड तालुक्यातून प्रथम क्रमांक मिळविला व जिल्हा स्पर्धेसाठी विद्यालय पात्र ठरले. जिल्हा स्पर्धेमध्येही विद्यालयाने आपली चमकदार कामगिरी दाखवत आपल्या दमदार कामगिरीच्या भरोशावरती तृतीय क्रमांक मिळविला.

विद्यालयामधील परिपूर्ण भौतिक सुविधा,विद्यार्थ्यांची शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील दमदार कामगिरी,भौतिक सुविधांची पर्याप्तता, आधुनिक पद्धतीने जतन संवर्धन केलेले शालेय रेकॉर्ड, डिजिटल साधनांचा शैक्षणिक प्रक्रियेत उपयोग, शाळेच्या बोलक्या भिंती व आनंददायी वातावरण, मतदान प्रक्रिया व साक्षरता प्रक्रियेतील उस्फूर्त सहभाग, सरल आणि यु-डायस पोर्टल वरील १००% कामगिरी या या सर्व बाबींच्या भरोशावरती विद्यालयाने यावर्षीच्या माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक मिळविल्याने विद्यालयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

विद्यालयाचे प्राचार्य बी.जी. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर बंधू-भगिनींनी विद्यार्थ्यांना सोबत घेत व गाव सहभागातून सदर क्रमांक पटकाविला. विद्यालयाचे या क्रमांकाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲडव्होकेट किरणरावजी सरनाईक, उपाध्यक्ष दादासाहेब लाहोरे, उपाध्यक्ष अरुणरावजी सरनाईक, संस्था सचिव भिकाजीराव नागरे, संचालक डॉ. स्नेहदीप सरनाईक, शाळा समितीचे अध्यक्ष महंत रमेश गिरीजी महाराज, संचालक डॉक्टर श्रीरामजी गरकळ,सौ गंगासागरताई चोपडे, अशोक आप्पा काष्टे यांनी अभिनंदन केले आहे. या यशामुळे विद्यालयाच्या गुणवत्तेचा पुन्हा एकदा प्रत्यय येऊन ग्रामीण भागातील या विद्यालयाने कमाल केली अशा प्रकारची प्रतिक्रिया पालक वर्गातून उमटत आहे.

# स्व. रामभाऊ टेमधरे स्मुर्ती तीन व्यख्यानमाला शुक्रवारपासून

**रिसोड/प्रतिनिधी : -स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालयाच्या विद्यमाने आयोजित तीन दिवशीय स्व. रामभाऊ टेमधरे स्मुर्ती व्याख्यानमालेची सुरुवात १८ ऑक्टोबर शुक्रवार पासून सायंकाळी ठीक ५:३० वाजता स्थानिक स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालय रिसोड येथे होणार आहे.स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालयाचे संस्थापक प्रा. कमलाकर टेमधरे यांनी वडिलांच्या स्मुर्ती प्रित्यर्थ ही व्याख्यानमाला सुरु केली असून यावर्षी यशस्वीपणे सदोतीस वर्षे पूर्ण होत आहेत.**

या व्याख्यानमालेला महाराष्ट्रातील साहित्य क्षेत्रातील अनेक नामवंतांनी हजेरी लावली आहे. प्रा. कमलाकर टेमधरे वाचनालयाच्या माध्यमातून वाचन संस्कृतीचे संवर्धन करण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात.वैचारिकदृष्ट्या समाजमन सुदृढ व निरोगी राहावे यासाठी व्याख्यानमाला व तत्सम ज्ञानी लोकांचे मार्गदर्शन महत्वपूर्ण ठरते. यासाठी सतत ३७ वर्षापासून वाचकांच्या व श्रोत्यांच्या सेवेत व्याख्यानमाला समर्पित आहे.१८ ऑक्टोबर पासून तीन दिवशीय सुरु होणाऱ्या पहिल्या दिवशी डॉ नंदकिशोर रंजवे सचिव डॉक्टर असोसिएशन रिसोड यांच्या अध्यक्षतेखाली व्याख्यानमालेचे पहिले पुष्प सुप्रसिद्ध आयुर्वेद विशारद डॉ.किशोर नागूलकर हे आयुर्वेदिक पंचकर्म म्हणजे आनंदातून आजाराची निवृत्ती या विषयावर गुंफणार आहेत.

१९ ऑक्टोबर शनिवारी प्रा.डॉ.भाऊराव रामेश्वर तनपुरे इतिहास विभाग प्रमुख मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय वाशीम हे सुख पर्वतावढे या विषयावर दुसरे पुष्प गुंफतील तररविवार २० ऑक्टोबरला शेवटच्या तिसऱ्या दिवशी सुप्रसिद्ध कवि प्रा. अण्णा जगताप संस्थापक निसर्गाची शाळा परभणी हे निरोगी जीवनाचा मार्ग निसर्गातून जातो हा मार्मिक विषय गमतीदार पद्धतीने मांडणार आहेत.

रिसोड शहरातील साहित्य क्षेत्रातील रसिकाना ही तीन दिवसाची पर्वणी आणि दिवाळीचे वैचारिक फराळ असणार आहे.तरी श्रोत्यांनी तिन्ही दिवस दररोज सायंकाळी ठीक ५:३० वाजता स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालय,तहसील कार्यलय समोर येथे उपस्थित राहण्याचे आवाहन व्याख्यानमाला आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# साखरे नंतर आता आनंदाचा शिधा किटही दुरापास्त

रिसोड : तालुक्यातील पुरवठा विभागवर स्वस्तधान्य दुकाणदारांचे पुर्णपणे वर्चस्व आसल्याची चर्चा रंगत आहे. कारण मागील ऑगस्ट महिन्यातील अंत्योदय लाभार्थ्यांना साखरेचे वाटप केले नसतांनी आता आनंदाचा शिधा किट मध्ये सुध्दा अनेक ठिकाणी काळाबाजार झाल्याच्या तोंडी तक्रारी महसुल विभागाकडे केल्या नंतरही फक्त लेखी तक्रार नसल्याची कारण देत कुठलीच चौकशी किंवा कारवाई होत नसल्याने तालुक्यातील स्वस्तधान्य दुकाणदारांच्या अधीपत्त्या खाली पुरवठा विभाग काम करीत आसल्याची खमंग चर्चा रिसोड शहरासह तालुक्यातील अनेक गावामध्ये रंगत आहे.

तालुक्यातील पुरवठा विभागाने स्वस्तधान्य दुकाणदारांना राणमोकळे केल्याने स्वस्तधान्य दुकानाची चौकशी किंवा तपासणी होत नाही.अनेक स्वस्तधान्य दुकाणदार लाभार्थ्यांना हक्काच्या रेशन धान्या पासुन वंचित ठेवत आहे.कुठल्याच स्वस्तधान्य दुकाणदार पुरवठा विभागाच्या नियमानुसार दुकाण चालवित नाही.तर लाभार्थ्यांची आणि रेशन खरेदीच्या पावतीची कधीच ओळख होत नाही.

रेशन डिलकर कडे रेषण प्राप्त झाल्या नंतर पुढील रेशन येई पर्यंत रेषणचे वाटप करणे आवश्यक आसतांनी अनेक स्वस्तधान्य दुकाणदारांच्या दंडेलशाहीचे बळ लाभार्थी ठरत आहेत तालुक्यातील बहुतांश गावातील रेशणचा तांदूळ खुलेआम खरेदी केल्या जातो. परंतु एकही महसुल अधिकारी कर्मचाली या संदर्भात कारवाई करीत नाही.त्यामुळे स्वस्तधान्य दुकानदारांची अरेरावी वाढली आसुनपुरवठा विभाग हा स्वस्तधान्य दुकानदारांच्या हातचे कथपुतले झाल्याची खमंग चर्चा तालुक्यातील रंगत आहे.(ता. प्र.)

# महा. राज्य पत्रकार संघटनेचे संवाद यात्रेला यश



**रिसोड**

रिसोड तालुक्यातील महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे, विश्वासराव आरोटे,श्री सपकाळे , विदर्भ प्रमुख निलेश सोमानी, जिल्हाध्यक्ष निनाद देशमुख यांच्या नेतृत्वात दीक्षाभूमी नागपूर ते मंत्रालय मुंबई पर्यंत पत्रकार संवाद यात्रा पत्रकारांना न्याय मिळवून देण्यासाठी काढण्यात आली होती. त्याचे फलित म्हणून राज्य सरकारने पत्रकार व विक्रेता त्यांच्यासाठी दोन स्वतंत्र मंडळे स्थापण्यास मंजुरात दिली . पत्रकार व विक्रेते यांच्यासाठी दोन स्वतंत्र मंडळे होतील. राज्य सरकारच्या निर्णयाचे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ वाशिम जिल्हा व रिसोड तालुक्याच्या वतिने पत्रकार संवाद यात्रेला यश आल्याने फटाके फोडुन जयघोष व जल्लोष करण्यात आला.यावेळी जिल्हाध्यक्ष निनाद देशमुख, आरोग्य सेल जिल्हाध्यक्ष केशव गरकळ, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष गणेश देगावकर, तालुकाध्यक्ष अरुण क्षिरसागर, शहराध्यक्ष प्रदिप खंडारे, नारायण आरु,संचिन गांजरे, डॉ प्रल्हाद कोकाटे, डॉ विलास ठाकरे, प्रदिप देशमुख, ज्ञानेश्वर कायंदे, डॉ रामेश्वर रंजवे, संतोष जुमडे यांच्यासह महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेचे पदाधिकारी व सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते.

पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक ) I R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# उत्तमचंद बगडीया महाविद्यालयात माहिती अधिकार सप्ताह

**रिसोड** :- उत्तमचंद बगडिया कला व वाणिज्य महाविद्यालयात दिनांक ६ऑक्टोबर २०२४ पासून माहिती अधिकार सप्ताह साजरा करण्यात आला. यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ७ऑक्टोबर २०२४ ला महाविद्यालयात माहिती अधिकाराविषयी जागृती करण्याकरिता निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.




या निबंध स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला डॉ. मंगला खेडेकर यांनी निबंध स्पर्धेचे परीक्षण केले. या निबंध स्पर्धेत वैष्णवी मोरे, पल्लवी खिल्लारे, स्वाती ढगे या विद्यार्थ्यांनी गुणांनुक्रमे प्रथम ,द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केले. ८/ऑक्टोबर २०२४ ला वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले या वक्तृत्व स्पर्धेत माहिती अधिकार व यातील तरतुदी विशद करणारे वक्तृत्व विविध विद्यार्थ्यांनी केले. या कार्यक्रनात डॉ. संजय टीकार, डॉ. किरण बुधवंत यांनी वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षण केले. या स्पर्धेत दिव्या खोटे, सविता देव्हारे, उर्मिला गिरी, भाग्यश्री कोकाटे या विद्यार्थ्यांनी गुणानुक्रमे प्रथम , द्वितीय तृतीय स्थान प्राप्त केले.

या माहिती अधिकार सप्ताह चे आयोजन प्राचार्य डॉ. विनोद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रमोद कुमार नंदेश्वर यांनी केले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये माहिती अधिकाराविषयी जागृती निर्माण व्हावी हा या कार्यक्रमाच्या उद्देश आहे. या कार्यक्रमास महाविद्यालयातील कर्मचारी डॉ. किरण बुधवंत, डॉ. अजबराव वानखेडे, डॉ. जयंत मेश्राम, प्रा. बोंडे,प्रा. ज्ञानेश्वर मुंडे, प्रा. सुभाष पांढरे, प्रा. गजानन कदम, प्रा. प्रजापती, प्रा. वानोरे, व शिक्षकेतर कर्मचारी हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन कु. उर्मिला गिरी, आभार कु. वैष्णवी घोडे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता अभिषेक लोहरे, शुभम कुकसे, अभिषेक तळेकर,आरती पोळकर, सविता देव्हारे, प्रज्ञा कांबळे यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.(वि. प्र)

## खा. धोत्रे यांच्या प्रयत्नातून मतदार संघासाठी २ कोटी रुपयांची विकास कामे मंजूर

**मालेगाव** : अकोला लोकसभा मतदारसंघाचे खासदार अनुप धोत्रे यांच्या प्रयत्नातून व पाठपुराव्यानंतर मतदार संघा अंतर्गत येणाऱ्या मालेगाव रिसोड तालुक्यात तब्बल २ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांना मंजुरात मिळाली असून या निधीतून दोन्ही तालुक्यातील अनेक गावातील सिमेंट कॉंक्रेट रस्ता तसेच तीन शेड सभागृह ही कामे मार्गी लागणार असून मंजूर कामे लवकर सुरू होणार आहे या कामामुळे ग्रामीण भागातील जनतेला मूलभूत सुविधा मिळणार आहे.

ग्रामीण भागात गावअंतर्गत नागरिकांना मूलभूत सुविधेसाठी अकोला लोकसभा मतदारसंघाचे युवा खासदार अनुप धोत्रे यांनी राज्य शासनाकडे २५ १५ अंतर्गत मालेगाव वर रिसोड तालुक्यातील ग्रामीण भागातील विविध गावासाठी विविध विकास कामे सुचविली होती खासदार अनुप धोत्रे यांनी सुचविलेल्या प्रमाणे व त्यांच्या प्रयत्नातून व पाठपुराव्याने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात तब्बल दोन कोटी रुपयांची विविध विकास कामे ही दोन्ही तालुक्यात मंजूर झाली आहे मंजूर कामामुळे मालेगाव व रिसोड तालुक्यातील ग्रामीण भागाचा विकास हा साधला जाणार आहे तर नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध होणार आहे अकोला लोकसभा मतदारसंघाचे खासदार अनुप धोत्रे यांच्या प्रयत्नातून मालेगाव तालुक्यात गावअंतर्गत मूलभूत सुविधा कामासाठी मंजूर झालेल्या कामांमध्ये शिरपूर येथे सिमेंट कॉंक्रेट रस्ता तसेच सभागृहाचे तीन कामे मंजूर झाले असून यासाठी तब्बल ३० लाख स्वरूपाचा निधी मंजूर झाला आहे त्याचबरोबर वडप येथे



सभागृहासाठी १० लाख रुपये जवळका रेल्वे ते सिमेंट कॉंक्रीट रस्त्यासाठी १० लाख रुपये पांगरी नवघरे येथे सिमेंट कॉंक्रीट रस्त्यासाठी १० लाख रुपये चिव रा सभा मंडपासाठी १० लक्ष रुपये राजुरा येथे सभा मंडपासाठी १० लाख रुपये पिंपळवाडी येथे सभागृहासाठी १० लाख रुपये किमी राजा येथे रस्ता कामासाठी १० लाख रुपये

याच बरोबर खासदार अनुप धोत्रे यांच्या प्रयत्नातून व पाठपुराव्याने रिसोड तालुक्यात रिठद सभागृहासाठी १० लाख रुपये मांगवाडी येथे सभागृहासाठी १० लक्ष रुपये भापूर येथे सभागृहासाठी १० लक्ष रुपये येवती येथे सभागृहासाठी १० लाख रुपये सवड येथे सभागृहासाठी १० लाख रुपये लोणी येथे सभागृहासाठी दहा लक्ष रुपये मौजा बंदी सभागृहासाठी १० लक्ष रुपये केशवनगर येथे सभागृहासाठी १० लाख रुपये चिखली येथे रस्ता कामासाठी दहा लाख रुपये तर गणेशपूर येथे सभागृहासाठी दहा लक्ष रुपये अशाप्रकारे एकूण दोन कोटी रुपयांची कामे ही मंजूर झाली आहे मालेगाव रिसोड तालुक्यात विविध कामे प्रस्तावितअकोला लोकसभा मतदारसंघ अंतर्गत येणाऱ्या मालेगाव व रिसोड तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी खासदार अनुप धोत्रे हे प्रयत्नशील असताना त्यांनी या दोन्ही तालुक्यातील सर्वांगीण विकासासाठी विविध कामे प्रस्तावित केली आहे तर लवकरात लवकर उर्वरित कामे ही मार्गी लावण्यासाठी खासदार हे प्रयत्नशील आहे.(ता. प्र.)

## पत्रकार, वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी दोन स्वतंत्र महामंडळे

राज्यातील पत्रकार तसेच वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी दोन स्वतंत्र महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अध्यक्षस्थानी होते. या दोन्ही घटकांची महामंडळ स्थापन करावी, अशी आग्रही मागणी होती. पत्रकार, तसेच वृत्तपत्र विक्रेंत्याच्या कल्याणासाठीच्या विविध योजना या महामंडळांमार्फत चालवण्यात येतील.

## पोस्ट ऑफिस समोरील देशी दारुचे दुकान सुरुच

रिसोड: शहरातील पोस्ट ऑफिस समोर सुरू असलेल्या देशी दारु दुकान चा परवाना रद्द करण्याच्या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडी तर्फे गेले अनेक दिवसापासून विविध प्रकारचे आंदोलन सुरु आहेत. यादरम्यान वंचित बहुजन आघाडीच्या वतीने वेळोवेळी निवेदन सह उपोषणही करण्यातआले मुख्याधिकारी यांनी सदर दुकानाचा परवाना रद्द करू असे आश्वासन देऊन उपोषणे सोडवले होते. मात्र अद्याप पर्यंत देशी दारुचे दुकान सुरुच आहे.

या अनुषंगाने ९ ऑक्टोबर रोजी वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी वाशिम जिल्हाधिकारी यांच्याकडे धाव घेत निवेदन सादर करून सदर प्रकरणाची गांभीर्याने दाखल घेण्याची मागणी केली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की सिव्हिल लाईन वर देशी दारुचे दुकान नाहरकत प्रमाणपत्र नगरपरिषद कडून देण्यात आले आहे. संबंधित दुकान हे मुख्य सिविल लाइन, पोस्ट ऑफिस समोर, शिवाजी शाळेच्या रस्त्यावर, बस स्टँडच्या बाजूला व तहसील कार्यालयाच्या मुख्य मार्गावर असल्यामुळे सदर नाहरकत रद्द करण्याकरिता ८ ऑगस्ट रोजी निवेदन दिले होते. त्यानंतर २३ ऑगस्ट रोजी पुन्हा निवेदन दिले २७ ऑगस्ट रोजी वंचित कडून उपोषण करण्यात आले. सदर उपोषण तीन दिवस झाल्यानंतर दहा दिवसात ना हरकत रद्द करण्याचे पत्र उपोषण कर्त्यांना देण्यात आले होते. दिनांक २४ सप्टेंबर रोजी निवेदन दिले व त्यामध्ये २७ सप्टेंबर रोजी डफडेबाजाव आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. आंदोलन सुरू होण्यापूर्वी मुख्याधिकारी यांनी परत लेखीपत्र देऊन त्यात ३० सप्टेंबर पर्यंत कारवाई चे आश्वासन दिले होते. मात्र नगरपरिषद कडून उडवा उडवीचे उत्तर देण्यात आले. मात्र अद्याप पर्यंत कोणत्याही प्रकारची कारवाई झाली नसून सदर प्रकरणाकडे गांभीर्याने दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदन देताना सैयद अकील तालुका अध्यक्ष, मोहम्मद आसिफ, शहर अध्यक्ष शेख, खाजा भाई शहर उपाध्यक्ष शुभम सावंत, शहर युवा महासचिव सैयद नाजिम, शहर उपाध्यक्ष शोएब शाह उपस्थित होते.(ता. प्र)

## आगरी समाजासाठी महामंडळ

आगरी समाजासाठी महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या महामंडळाच्या माध्यमातून आगरी समाजातील विविध घटकांसाठी विशेषत: युवकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतील.

## मदरशां मधील शिक्षकांच्या मानधनात वाढ

मदरशांमधील डी. एड., बी.एड. शिक्षकांना देण्यात येणाऱ्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेत राज्यातील मदरसांमध्ये पारंपरिक, धार्मिक शिक्षणाबरोबरच गणित, विज्ञान, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दूचे शिक्षण देण्यासाठी कंत्राटी पद्धतीने शिक्षकांची नेमणूक करण्यात येते. सध्या डी. एड. शिक्षकांना सहा हजार रुपये मानधन देण्यात येते, ते १६ हजार रुपये करण्यात येईल. तसेच माध्यमिकचे विषय शिकवणाऱ्या बी.ए. बी.एड., बी.एस्सी-बी.एड. शिक्षकांचे मानधन आठ हजार रुपयांवरून १८ हजार रुपये करण्यात येईल.

## चार वर्षापासून शेतकरी रोहित्रच्या प्रतीक्षेत

### रोहित्र बसविण्यास महावितरण ची टाळाटाळ.

रिसोड : चार वर्षांपूर्वी कोटेशन भरले असले तरी अजूनही शेतकऱ्याच्या शेतात रोहित्र बसविले नसल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे महावितरण कंपनीकडून रोहित्र देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे.वीज वितरण कंपनी नेहमीच यांना त्या कारणाने चर्चेत असते कधी भार नियमन , वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा तर कधी कार्यालयाकडून रोहित्र वीज जोडणी करण्यास टाळाटाळ याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसत असून आर्थिक नुकसान होत आहे आधीच अस्मानी सह सुलतानी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना वीज वितरण कंपनीच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे रिसोड येथील शेतकरी जनार्दन सिताराम क्षीरसागर यांनी शेतामध्ये रोहित्राची मागणी केली असून मार्च 2020 मध्ये कोटेशन भरले आहे कोटेशन भरून जवळपास चार वर्षाचा कालावधी लोटला असला तरी अजूनही त्यांच्या शेतात रोहित्र बसविण्यात आले नाही त्यांनी आजपर्यंत वारंवार महावितरणाच्या रिसोड व वाशीम येथील कार्यालयात जाऊन या प्रकरणी पाठपुरावा केला आहे तब्बल चार वर्षाचा कालावधी उलटला असला तरी अजूनही त्यांच्या शेतात रोहित्र बसविण्यात आले नसल्यामुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे या नुकसानीला जबाबदार कोण असा प्रश्न या अनुषंगाने उपस्थित होत आहे.

### पुढील महिन्यात करु कामे

**महावितरणाची सर्व कामे ठेकेदारा मार्फत केल्या जातात सध्या पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे काही कामे राहिली आहेत पुढील महिन्यात पेंडिंग असलेली सर्व कामे निकाली काढण्यात येतील असे येथील महावितरण कंपनीच्या कार्यालयातून सांगण्यात आले आहे.**

# महाविकास आघाडीच्या वतीने ट्रॅक्टर मोर्चा

## रिसोड येथे शेतकऱ्यांचा आक्रोश; विविध मागण्यांसाठी ट्रॅक्टरचालक रस्त्यावर

रिसोड, ता. १४ : शेतकऱ्यांच्या विविध मागण्याकरिता रिसोड येथे १४ ऑक्टोबर रोजी रोजी महाविकास आघाडीच्या वतीने ट्रॅक्टर मोर्चाचे आयोजन करण्यात आले. पाचशे ट्रॅक्टरसह शेकडोच्या संख्येने शेतकरी मोर्चात सहभागी झाले होते. अमरदास बाबा संस्थानच्या भव्य प्रांगणातून मोर्चाला सुरुवात झाली.

शेतकऱ्यांच्या विविध मागण्याकरिता १४ ऑक्टोबर रोजी रोजी महाविका आघाडीच्या वतीने आमदार अमित झनक यांचे नेतृत्वात ट्रॅक्टर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचे सर्व विषय असल्यामुळे मोर्चाला मोठा प्रतिसाद मिळाला. पाचशे ट्रॅक्टर सह शेकडोच्या संख्येने शेतकरी मोर्चामध्ये सहभागी झाले होते येथील अमरदास बाबा यात्रा मैदानापासून ट्रॅक्टर मोर्चाला सुरुवात होऊन अष्टभुजा देवी चौक, आसन गली, छत्रपती शिवाजी महाराज चौक, सिव्हिल लाईन मार्गे तहसील कार्यालयावर मोर्चा धडकला या ठिकाणी भव्य सभेचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी आमदार अमित झनक यांच्यासह इतर नेत्यांनी शेतकऱ्यांच्या समस्या मांडल्या. यानंतर महाविकास आघाडीच्या वतीने तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, वाशीम जिल्ह्याचा दुष्काळग्रस्त जिल्ह्यांच्या यादीत समावेश करावा, सोयाबीन हमी भाव द्यावा, वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करावा, वीज समस्या दूर करावी, शेतकऱ्यांचे स्प्रिंकलर व ठिबकचे अनुदान जमा करावे, शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी, पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर तात्काळ जमा करावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली. मोर्चात ट्रॅक्टरधारक व शेकडोच्या संख्येने शेतकरी व काँग्रेस, शिवसेना उबाठा, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ठाणेदार भूषण गावंडे यांनी चोख पोलिस बंदोबस्त ठेवला होता.

> ❝ प्रराज्यांतील व केंद्रातील भाजपप्रणित सरकारे शेतकरी विरोधी आहेत. सोयाबीन आयात धोरणाने सोयबीन उत्पादक शेतकरी नाडला जात आहे. मोठ्या उद्योगपतींचे कर्ज माफ करणारे भाजप सरकार शेतकऱ्यांचे सोयाबीन आले की परदेशातून आयात करते. शेतकऱ्यांचा माल मातीमोल भावात विकला जात असताना या सरकारला शेतकऱ्यांची दैना दिसत नाही. महाविकास आघाडीने या शेतकरीविरोधी सरकारच्या विरोधात रणशिंग फुंकले आहे.
>
> **- अमित झनक,** आमदार



रिसोड : महाविकास आघाडीच्या वतीने काढण्यात आलेल्या मोर्चात ट्रॅक्टरची लागलेली रांग.



## रिठद जिल्हा परिषद शाळेत वन्यजीव सप्ताह

**रिसोडः** महाराष्ट्र शासन अंतर्गत, उप वन संरक्षक मा अभिजित वायकोस यांच्या मार्गदर्शनाखाली कोब्रा ?डव्हेंचर क्लबच्या आकाश आहाळे यांच्या वतीने जिल्हा परिषद केंद्रीय उच्च प्राथमिक शाळा रिठद १ येथे वन्य जीव सप्ताह साजरा करण्यात आला. यामध्ये वर्ग ५ ते वर्ग ७ च्या विद्यार्थ्यांनी चित्रकला स्पर्धांमध्ये सहभाग घेतला सहभागी विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे व खाऊ वाटप करण्यात आला. कार्यक्रमाला वनपाल किशोर सरनाईक यांनी सखोल मार्गदर्शन केले. वनरक्षक वैभव पळसकर यांनी सहकार्य केले.

कार्यक्रम आयोजित करण्याकरिता मुख्याध्यापक मनोज इंगळे, गजानन मापारी , किसन साबळे , आशाताई बोरकर ,मदन आरू , बाळकृष्ण बोरकर , ज्ञानेश्वर आरू ह्यांनी मदत केली. (श. प्र.)

# सोयाबीन उताऱ्यात मोठी घट

## शेतकऱ्यांचा लागवड खर्चही निघेना : हमी भावापेक्षाही कमी भावाने होतेय सोयाबीन खरेदी

रिसोड, (ता. प्र.). एकेकाळी कापूस आणि ज्वारीचे मोठ्याप्रमाणावर उत्पादन घेणारा वाशीम जिल्हा हा गेल्या काही वर्षांपासून सोयाबीन बेल्ट म्हणून नावारूपाला आला आहे. वाशीम जिल्ह्यात नगदी पीक म्हणून घेतल्या जाणाऱ्या सोयाबीनचा सध्या मळणीचा हंगाम सुरू आहे. मात्र, उत्पादनात एकरी 3 ते 4 क्विंटलचाच उतारा येत असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

यंदा पेरणी पासूनच सतत होणारा पाऊस तसेच वातावरणातील बदलावामुळे सोयाबीन पिकांवर सप्टेंबरच्या अखेरीस येलो मोझाक सारख्या बुरशीजन्य रोगासह किडीचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाला. त्यामधे काही प्रमाणात सोयाबीनची उत्पादनात घट झाली. तर त्यासोबतच सततचा होणारा पाऊस पडल्यामुळेही खरिपातील सोयाबीनच्या पिकाला अपेक्षेप्रमाणे शेंगा लागल्या नाहीत. पावसाच्या उघडीनंतर शेंगा पोखवण्याच्या अवस्थेत सोयाबीन पीक असताना संपूर्ण



जिल्ह्यात धुक्याची चादरच पसरली होती. त्यामुळे सोयाबीन पिकाच्या शेंगा भरल्या नसल्याने यावर्षी जिल्ह्यात सोयाबीन उताऱ्यात घट येत आहे. दरवर्षी वाशीम जिल्ह्यामध्ये कमी अधिक प्रमाणात शेतकऱ्यांना सोयाबीनचा एकरी 9 ते 10 क्विंटल येणारा उतारा यावर्षी निम्म्यावरच येऊन ठेपल्याने शेतकऱ्यांना एकरी 3 ते 4 क्विंटल सोयाबीन होत असल्याने पेरणीपूर्व मशागती पासून ते काढणी पर्यंतच्या मशागतीचा शेतकऱ्यांचा लागवड खर्चही वसूल होईना. जिल्ह्यात खरिपात सर्वाधिक क्षेत्रावर सोयाबीन पिकाची पेरणी झाली. यंदाही शेतकऱ्यांनी सोयाबीनला नगदी पीक म्हणून पसंती दिली. तसेच खरीप पिकांची पेरणी देखील जून महिन्यात मृग नक्षत्रात झाली होती. त्यामुळे यावर्षी चांगले उत्पादन होईल ही शेतकऱ्यांची आशा आता मावळत आहे. सोयाबीनचे एकरी उत्पादन निम्म्यावर आले असतानाच रासायनिक खताबरोबरच यंदा उत्पादन खर्चात 20 ते 30 टक्क्यांची वाढ झाली. सोयाबीन काढणीचा दर एकरी 4 हजार रुपये झाला आहे. असे असताना उत्पादनात मात्र लक्षणीय घट येत असल्याने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही वसूल होत नसल्याचे शेतकऱ्यांचे मत आहे.

### कमी दराने माल खरेदी केल्यास दाखल होऊ शकतो गुन्हा

केंद्र शासनाने सोयाबीनसाठी किमान आधारभूत किमत 4892 रुपये एवढी ठरवून दिलेली आहे. सूचनापत्रात दिलेल्या माहितीनुसार, केंद्र शासनाने सोयाबीन हमीभावाने खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय केंद्रीय कृषी मंत्रालयाने समर्थन मूल्य योजनेंतर्गत घेतला आहे. यावर्षीचा सोयाबीन हमीभाव 4 हजार 890 निश्चित केलेला आहे. असे असताना मात्र जिल्ह्यात व्यापारी 4000 ते 4400 पेक्षा कमी दराने सोयाबीन खरेदी करीत आहेत. मात्र, शासनाने निश्चित केलेल्या हमीभावापेक्षा कमी दराने व्यापारी माल खरेदी करत असल्यास 'पणन कायदा 34 आणि 94 'ड' यानुसार गुन्हा दाखल होऊ शकतो. जिल्ह्यातील बाजार समित्यांचे प्रशासन आणि त्यांचे संचालक मंडळ अशा प्रकारची कारवाई करून खरचं शेतकऱ्यांना न्याय देणार का? हा प्रश्न उपस्थित घेण्यात आले.

# जळालेले विद्युत ट्रान्सफॉर्मर २४ तासात बदला

## आ. भावना गवळी पाटील यांचे निर्देश–महावितरणच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा



वाशिम : रब्बीचा हंगाम सुरु होताच वाढत्या विद्युत भारामुळे विजेचा लपंडाव व ट्रान्सफॉर्मर जळणे सुरु झाले आहे. याबाबत आ. भावना गवळी पाटील यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून विजेच्या समस्या तात्काळ दूर करून जळालेले विद्युत ट्रान्सफॉमर २४ तासात बदलून देण्याचे निर्देश दिले आहे. सध्या खरीपाचा हंगाम अंतिम टप्प्यात आला असून बहुतांश शेतकरी रब्बी हंगामाच्या तयारीत लागले आहे. जिल्ह्यात रब्बी हंगामात हरभरा व गहू पिकाची पेरणी मोठ्या प्रमाणात होते. त्याच प्रमाणे तूर पिकालाही पाणी देण्याची गरज असते. मात्र, विजेचा भार वाढल्याने जिल्ह्यातील काही भागात विजेचा लपंडाव सुरु झाला असून काही भागात विद्युत ट्रान्सफॉर्मर जळत असल्याच्या घटना घडणे सुरु झाले आहे. मात्र, रब्बीच्या हंगामात पिकाला पाणी देण्यासाठी विद्युत पुरवठा अत्यंत आवश्यक असते. त्यामुळे शिवसेना पक्ष नेत्या आ. भावनाताई गवळी पाटील यांनी महावितरणचे वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून शेतकऱ्यांना अखंडित विज पुरवठा मिळण्याकरिता विजेच्या समस्या तात्काळ निकाली काढून जळालेल्या ट्रान्सफॉर्मरचा रिपोर्ट त्याच दिवशी पाठवून ट्रान्सफॉर्मर बदलून देण्यात यावे असे निर्देश दिले.

> **अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागा ८ दिवसात भरा !**
>
> अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागामुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण येतो. परिणामी अपेक्षित कामे वेळेवर होत नाही. करिता उपकार्यकारी अधिकारी, सहाय्यक अभियंता, अतिरिक्त अभियंता, वायरमन यासह विविध रिक्त असलेली पदे ८ दिवसात भरण्याच्या सूचना आ.भावना गवळी पाटील यांनी दिल्या आहेत.

## ७५ टक्के अनुदानावर चार्जिंग फवारणी पंप व स्पायर सेप्रेटरसाठी अर्ज मागविले

वाशिम,दि.१३ ऑक्टोबर (जिमाका) जिल्हा परिषद उपकर योजने अंतर्गत सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात ७५ टक्के अनुदानावर फवारणी चार्जिंग पंप व स्पायर सेप्रेटर या दोन बाबी साठी दि. ११ नोव्हेंबर २०२४ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आले आहेत.

शेतकरी बांधवांना आवाहन करण्यात येते की, उपरोक्त दिनांकापुर्वी आपला अर्ज संबंधीत पंचायत समिती मध्ये सादर करावा अधिक माहीतीसाठी कृषी विस्तार अधिकारी, कृषी अधिकारी, पंचायत समीती तसेच कृषी विकास अधिकारी जि. प. यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. कृषी विकास अधिकारी जि. प. वाशिम यांनी कळविले आहे.

# रिसोड तालुक्यातील ४ गावांमध्ये ८५ लक्ष रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन

**रिसोड,**

**रिसोड –** रिसोड तालुक्यातील बाळखेड, धोडप बोडखे, गणेशपूर, आणि पाचंबा येथे ९५/५ योजनेंतर्गत ८५ लक्ष रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन माजी आमदार अ‍ॅड. विजयराव जाधव यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. या सोहळ्याच्या बाळखेड येथे कार्यक्रमाचे अध्यक्ष सचिन पर्हाड, धोडप बोडखे येथे माजी सरपंच आत्माराम बोडखे, तर गणेशपूर व पाचंबा येथे जिल्हा परिषद सदस्य अमितजी खडसे हे अध्यक्षस्थानी होते. या प्रसंगी अ‍ॅड. विजयराव जाधव यांनी जनतेला आश्वासन दिले की, रिसोड तालुक्यातील गावांना विकासनिधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. त्यांनी पुढे सांगितले की, मागील १५ वर्षांत



मतदारसंघ विकासापासून वंचित राहिला आहे, परंतु भविष्यात आपल्याला पुन्हा सेवा करण्याची संधी मिळाली तर त्या संधीचे सोने करून मतदारसंघाचा विकास सुनिश्चित केला जाईल. जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ न देण्याचे आश्वासनही दिले. यावेळीत्यांनी बालाजी साखर कारखान्याच्या पुनरुज्जीवनाचा उल्लेख केला, ज्यामुळे शेतकऱ्यांना आणि स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.